दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

वर्ष १७ वे • अंक ९२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.२ जुलै २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पाच दिवस अलर्ट; कोकणात मुसळधार पावसाची शक्यता

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महिनाभराच्या विलंबाने महाराष्ट्रात पोहोचलेल्या पावसाने जोर पकडला आहे. मुंबईमध्ये पुढील पाच दिवस यलो अलर्ट देण्यात आला आहे.

पालघर, मुंबई, ठाणे, कोल्हापूरपर्यंत पुढील तीन दिवस मुसळधार पाऊस कोसळणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. यामुळे मुंबईत पाणी तुंबण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आपत्ती व्यवस्थापन विभागासोबत बैठक होत आहे. यामध्ये अधिकाऱ्यांना खबरदारीचे आदेश देण्यात येणार आहे.

पश्चिम महाराष्ट्रापासून ते विदर्भापर्यंत चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहे. मुंबईतील



नागरिकांना गरज असेल तरच घराबाहेर पडा, असे आदेश देण्यात आले आहेत.

गेल्या दोन दिवसांपासून मुंबईमध्ये पाऊस कोसळत आहे. काल पहिल्या दिवशी मुंबईतील नेहमीच्या ठिकाणी पाणी साचले होते. हिंदमाता चौक, अंधेरी, गांधी मार्केट आदी भागात पाणी साचले होते. रात्री उशिरा या पाण्याचा निचरा झाला.

राज्यात गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत मागील २४ तासांत कोकणात मुसळधार पाऊस झाला. सर्वाधिक मुंबईत १२६ मि.मी., तर रत्नागिरीत ८३ मि.मी. पाऊस झाला. सांताक्रूझ, अलिबाग येथे ५३ मि.मी. तर डहाणूत २१ मि.मी. पाऊस झाला. विदर्भातील अमरावतीत १५, वर्धा १४, बुलडाणा ६, नागपूर ४, ब्रह्मपुरी, चंद्रपूर १ तर मध्य महाराष्ट्रातील कोल्हापूरमध्ये ९, महाबळेश्वर ८, सांगली ५ मि.मी. पाऊस पडला. कोकण वगळता उर्वरित भागात येत्या चार दिवसांत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# कशेडी घाटातील चारपदरीचे दोन पदर दरडीखाली

## वाहतुक रामभरोसे-ठेकेदार कंपनीचे सपशेल दुर्लक्ष



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

महाड भोर मार्गावरील वरंध घाटातील वाघजाई मंदिराजवळील दरड बुधवारी कोसळल्यानंतर पोलादपूर तालुक्यातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटातही गुरूवारी सायंकाळी लालमातीचा ढिगारा चारपदरी रस्त्यावरील दोन पदरी रस्त्यावर येऊन कोसळल्याने एकाच मार्गिकेवरून दुहेरी वाहतूक सुरू ठेवण्यात आली. एलअॅण्डटी या ठेकेदार कंपनीने दिवसभर सपशेल दूर्लक्ष केल्याने उशिरापर्यंत हा लालमातीच्या दरडीचा ढिगारा एका मार्गिकेवर तसाच पडून राहिला.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर कशेडी घाटाच्या सुरूवातीला चोळई गावापासूनच एकाबाजूला डोंगर कापून काँक्रीटीकरणाचा रस्ता खेड बाजूकडून पोलादपूरकडे वाहतुक करीत आहे. या रस्त्यावर गेल्या चार वर्षांपासून अनेकवेळा डोंगरातून लालमातीचा कडे कोसळून दरडी पडल्याने वाहतुक ठप्प झाली होती. गुरूवारी दुपारनंतर चोळई येथे उभा डोंगर कापल्यामुळे दरड कोसळण्याची घटना घडल्यानंतर रस्त्यालगतच्या संरक्षक कठड्यावरून हा ढिगारा काँक्रीटच्या रस्त्यावर आल्याचे दिसून आले. यावेळी एलअॅण्डटी ठेकेदार कंपनीने पावसाची रिपरिप सुरू असल्याकारणाने तातडीने दरडीचा ढिगारा हलविण्याचे टाळले. यामुळे चारपदरी राष्ट्रीय महामार्गपैकी दोन पदरी रस्ता या दरडीमुळे बंद झाला.


पोलादपूर ते कशेडी टॅप पर्यंतच्या कशेडी घाटामध्ये चोळई गावठाण, चोळई महाविद्यालय, चोळई ते अन्नपूर्णा हॉटेलचा समोरील डोंगरभाग धामणदिवी, भोगाव येलंगेवाडी दत्तवाडी अशा भागात लालमातीचे डोंगर उभे कापल्याने पावसाचे पाणी या डोंगरावर पडून लालमातीचे ढिगारे कोसळण्याच्या घटना वारंवार घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटातील वाहनांचा प्रवास जीव मुठीत घेऊन करावा लागणार आहे.

# उरणमध्ये दमदार पाऊस ; खोपटा गावाजवळील भात शेती पाण्याखाली

**दै.रायगड नगरी । उरण**

कोकण किनारपट्टीवर पावसाचा जोर कायम असल्याने उरण तालुक्यातील अनेक भागात दमदार हजेरी लावली आहे.९० मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून खोपटा गावाजवळील भात शेती पाण्याखाली गेल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

गुरुवारी ( दि३०) रात्री पासून उरण तालुक्यात पावसाच्या सरी पडायला सुरुवात झाली. सदर पाऊस हा भात रोपांना,शेतीला पोषक ठरत असल्याने भात शेतीला वेग येणार आहे. त्यामुळे शेतकरी सुखावला आहे. तसेच रानसई धरण व पुनाडे धरण परिसरात पावसाचा जोर वाढत असल्याने व हिच परिस्थिती कायम राहील्याने धरण परिसरात पाण्याच्या



पातळीत वाढ होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

खोपटा सह इतर गावात पावसाच्या पाण्याचा निचरा होणारे स्त्रोत हे विकासक करीत असलेल्या दगड मातीच्या भरावा मुळे बंद पडल्याने पावसाचे पाणी साचून राहिल्याचे चित्र ठिक ठिकाणी पहावयास मिळत आहे. त्यातच खोपटा गाव परिसरातील भात शेती पाण्याखाली गेल्याचे चित्र ही पाहावयास मिळत आहे. एकंदरीत पावसाची गती अशीच राहिली तर पुढील एक दोन दिवसात शेतीच्या मशागतीची, लागवडीची कामे जोरात सुरू होतील असे शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

# १९ वर्षीय तरुणीचा अपघात करून पळून जाणाऱ्या ट्रकचालकांना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबई पुणे हायवे वाहिनीवर कोन येथे ट्रकने मोटरसायकलला धडक देऊन १९ वर्षीय आयरीन सुसान जोसेफ (राहणार इंडियाबुल सोसायटी कोन) या तरुणीचा मृत्यू झाला होता. अपघातानंतर ट्रक चालक पळून गेले. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मोटर ट्रक क्रमांक चक०६ --ट- ८२२४ आणि चक४६ - इत्र- ८१०८ असून संजय रामचंद्र जाधव (वय ४४, व्यवसाय-चालक, साठेनगर, घाटकोपर), बालकुशीन जयराम कुमार (२५ वर्ष व्यवसाय-चालक, सॉल्ट पॅन्ट रोड, वडाळा) अशी आरोपिची नावे आहेत.

गोवर्धन टी गोपी (वय २२) हा आयरीन सुसान जोसेफ असे दोघे मोटरसायकल एम एच ४३ एई ६९९५ घेऊन कोन गावच्या दिशेने जात होते. यावेळी पाठीमागून येणाऱ्या कंटेनर ट्रक चालकाने त्यांच्या मोटरसायकलला ठोकर मारली. यात आयरीनचा मृत्यू झाला. त्यानंतर दोन्ही कंटेनर ट्रक पळून गेले होते. या गुन्ह्याचा तपास करण्याचे मोठे आव्हान पनवेल तालुका पोलिसांसमोर होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय गळवे यांच्या पथकाने तपास करण्यास सुरुवात केली.

पथकाने घटनास्थळी भेट देऊन आसपासचे सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता सीसीटीव्ही फुटेजमध्ये दोन मोठे कंटेनर ट्रेलर यांनी मोटर सायकलला ठोकर मारून पळून गेल्याचे दिसून आले. दोन्ही कंटेनर ट्रेलरवर काही सांकेतिक निशाणी असल्याचे दिसून आल्याने अपघात घटनास्थळापासून व अपघात वेळेपासून ट्रक ज्या मार्गाने निघून गेले त्या मार्गिकेवरील एकूण १७ ठिकाणाचे सी.सी. टी.वी फुटेज चेक केले असता एक ट्रक शेडुंग टोल नाक्याच्या दिशेने व दुसरा ट्रक एक्सप्रेस हायवेवरून पुण्याच्या दिशेने जात असल्याचे दिसले.

सदर मार्गातील सर्व .../२

# एकनाथ शिंदेंची नेतेपदावरून हकालपट्टी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पक्षाविरोधात बंड करून भारतीय जनता पक्षाच्या पाठिंब्यानं मुख्यमंत्री झालेल्या एकनाथ शिंदेंविरोधात पक्षानं मोठी कारवाई केली आहे. एकनाथ शिंदे यांची पक्षनेतेपदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे. शिंदे यांनी पक्षाविरोधात बंड केलं. शिवसेनेचे ३९ आमदार त्यांच्यासोबत आहेत. यानंतर शिंदे गटानं पक्षावरच दावा सांगितला. त्यामुळे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी शिंदे यांच्याविरोधात मोठी कारवाई केली आहे. पक्षविरोधी कारवाई केल्याचा उल्लेख शिवसेनेनं शिंदेंना पाठवण्यात आलेल्या पत्रात केला आहे.

काँग्रेस, राष्ट्रवादीसोबतचं सरकार नको, भाजपसोबत चला अशी भूमिका घेत शिंदेंनी बंडखोरी केली. त्यांच्या बंडाला शिवसेनेच्या ३९ आमदारांनी साथ दिली. १० अपक्ष आमदारदेखील त्यांच्या पाठिशी उभे राहिले. शिंदे गट सरकारमधून बाहेर पडल्यानं महाविकास आघाडी सरकार कोसळलं. मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना राजीनामा द्यावा लागला. आपल्याच माणसांनी विश्वासघात केल्यानं ही वेळ आल्याचं ठाकरे राजीनामा देताना म्हणाले. एकनाथ शिंदेंनी काल भाजपच्या पाठिंब्यानं मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. शिवसेनेचे ५५ पैकी ३९ आमदार आपल्यासोबत असल्यानं आम्हीच खरी शिवसेना असल्याचा दावा शिंदे गटानं केला. शिंदे यांनी थेट शिवसेनेवरच दावा सांगितल्यानं उद्धव ठाकरेंनी संताप व्यक्त केला होता. विधिमंडळातील खरी शिवसेना कोणती असा प्रश्न शिंदेंच्या दाव्यानं निर्माण झाला. हा तांत्रिक पेच कायम असताना शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी शिंदे यांच्यावर मोठी कारवाई केली आहे. पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका शिंदे यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

# धानकान्हे आदिवासीवाडी येथे घरावर विद्युत पोल व झाड कोसळले

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील धानकान्हे आदिवासीवाडी येथील राहत्या घरावर विद्युत पोल कोसळलल्याची घटना घडली आहे.

याबाबत प्राप्त माहितीनुसार सध्या कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे नागरिकांना विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे पहावयास मिळत आहे.

तर धानकान्हे रहिवासी असणारे रंजन जाधव यांच्या घरावर विद्युत पोल कोसळला तर संतोष जाधव यांच्या घरावर घराशेजारील एक मोठे झाड कोसळले आहे.

या दुर्घटनेत रंजन जाधव व संतोष जाधव यांच्या घरांचे मोठे नुकसान झाले आहे.

या दुर्घटनेमुळे रंजन जाधव व संतोष



जाधव यांच्या परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला असून या ऐन पावसाळ्याच्या दिवसात आपापली घरे नादुरुस्त झाल्याने विविध समस्यांचा सामना करावा लागणार आहे.

या दोन्ही दुर्घटनांची माहिती मिळताच येथील सरपंच वसंत भोईर, उपसरपंच सूरज कचरे, सामाजिक कार्यकर्ते पाडुरंग गोसावी व ग्राम विकास अधिकारी यांनी घटनास्थळी धाव घेऊन शासकीय स्तरावर पंचनामे करून शासनाकडून लवकरात लवकर व अधिकाधिक नुकसान भरपाई कशी मिळेल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी याबाबत माहिती देताना सांगितले.

# मा.मुख्यमंत्री वसंतराव चव्हाण जयंती निमित्ताने पमपा मुख्यालयात अभिवादन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्ताने पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज (१ जुलै) वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला आयुक्त गणेश देशमुख आणि उपायुक्त गणेश शेटे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सदर कार्यक्रमास महापालिका कर्मचारी उपस्थित होते.



# मुरुडमध्ये पावसाची दमदार बॅटिंग : २४ तासात १०४ मि. मि. पावसाची नोंद

**दै.रायगड नगरी । मुरुड**

हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार हुलकावणी देत अखेर उशीरा सुरुवात केली असली तरी मुरुडमध्ये सलग चार दिवसांपासून चांगला पाऊस पडत आहे. गेल्या २४ तासांमध्ये मुरुड मध्ये १०४ मि. मि. पावसाची नोंद झाली आहे तर एकूण आतापर्यंत मुरुडमध्ये ६३४ मि. मि. पावसाची नोंद झाली आहे.

सतत होणारे हवामानातील बदल यामुळे सुरुवातीपासून मान्सून हुलकावणी देत होता. मुरुड मध्ये दिवसा कडकडीत ऊन पडत असे तर रात्रीच्या वेळी वरून राजा हजेरी लावत असे. त्यामुळे मुरुड मधील शेतकरी चिंतेत होते. दिवसभर कडकडीत उन असल्याकारणाने पेरलेले पीक वाया जाते की काय असे वाटत होते.

दिवसभर कडकडीत उन असल्या कारणाने उष्णता सहन होत नव्हती. हळूहळू पावसाची रिपरिप वाढू लागली व वातावरणातील उष्णता कमी होऊ लागली. त्यामुळे मुरुडकरांना अखेर उष्णतेपासून दिलासा मिळाला. आणि या पावसाने दमदार सुरुवात केल्याने बळीराजाही सुखावला आहे.दमदार पावसामुळे भाताच्या रोपांना जिवदान मिळाले असून शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.



# शपथ ही धक्क्यांची !

गेले दहा दिवस महाराष्ट्राच्या राजकारणात जे भूकंप होत आहेत; ते थांबण्याची लक्षणे नाहीत. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर भारतीय जनता पक्ष आणि देवेंद्र फडणवीस यांनी दीर्घकाळ मौन पाळले होते. ते मौन फडणवीस यांनी सोडले, तेव्हा त्यांनी एकनाथ शिंदे हे पुढचे मुख्यमंत्री होतील, असे जाहीर केले. आपण स्वत: या सरकारमध्ये नसू, असेही त्यांनी जाहीरपणे म्हटले. प्रत्यक्षात तासा–दीड तासात झालेल्या शपथविधीत त्यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. एकनाथ शिंदे यांनाही हे बंड करताना मुख्यमंत्रिपद हवेच होते का, हा प्रश्न अजून अनुत्तरित आहे. मात्र, शिंदे यांना हे पद देण्याचा निर्णय फडणवीस घेऊ शकत नाहीत. तो दिल्लीत झाला असणार. दिल्लीतील राजकीय समीकरणे आणि भाजपमधील सत्तास्थानांची उतरंड पाहता गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे हा निर्णय झाला असू शकतो. जे. पी. नड्डा हे पक्षाध्यक्ष असले तरी ते गृहमंत्र्यांच्या शब्दाबाहेर नाहीत. 'भाजपने कुणाला कोणते पद द्यायचे आणि कुणाला पाठिंबा द्यायचा, हा त्यांचा अंतर्गत प्रश्न असला तरी महाविकास आघाडीचे सरकार हे 'अनैसर्गिक व अंतर्विरोध असणारे सरकार' आहे, अशी टीका गेली अडीच वर्षे भाजपने करीत होते. या टीकेत तथ्य होते. ते सरकार गेले. मग नवे सरकार करताना संख्याबळ कमी असणाऱ्या एकनाथ शिंदे यांच्याकडे नेतृत्व देण्यामागे कोणती भूमिका होती? १२० आमदारांचा नेता उपमुख्यमंत्री आणि ५० आमदारांचा नेता मुख्यमंत्री, हे सरकार नैसर्गिक किंवा अंतर्विरोध नसणारे असेल का? बिहारमध्ये भाजपने जास्त आमदार असूनही आधी जाहीर केल्यानुसार नितीश कुमार यांच्याकडे मुख्यमंत्रिपद दिले. तोच प्रयोग वेगळी रीत वापरून इथे झाला आहे. एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री झाल्याने उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला अधिक मोठा धक्का बसला आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्वप्नाप्रमाणे 'एक सर्वसामान्य शिवसैनिक' सर्वोच्च पदावर आरूढ झाला. एकनाथ शिंदे हे बाळासाहेब आणि आनंद दिघे यांना आदर्श मानतात आणि ते यापुढेही हा वारसा उचरवाने वारंवार उच्चारतील. मग शिवसेनेतील संघर्ष केवळ विधिमंडळात राहणार नाही. तो कदाचित शिवसेनेच्या प्रत्येक शाखेपर्यंत जाऊ शकतो. एका अर्थाने, शिवसेनेचा एक मुख्यमंत्री जाऊन शिवसेनेचाच दुसरा मुख्यमंत्री आला आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाला कायमचा आणि प्रभावी शह देण्यासाठी दिल्लीश्वरांनी हा निर्णय घेतलेला दिसतो. शिंदे मुख्यमंत्री झाल्याने शिवसेनेचे उर्वरीत आमदार किंवा खासदारांनी वेगळा विचार सुरु केला तर मूळ पक्षाची नवी पंचाईत होईल. राष्ट्रवादी काँग्रेसकडे महाराष्ट्रातील मराठा समाजाचा प्रतिनिधी म्हणून पाहिले जाते. एकनाथ शिंदे हे स्वत: मराठा समाजातील असल्याने तोही विचार त्यांच्याकडे हे पद देताना झाला असू शकतो. गेल्या भाजप–सेना सरकारमध्ये शिंदे हे देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री होते. आता ते 'बॉस' आणि फडणवीस हे उपमुख्यमंत्री आहेत. खरेतर, उपमुख्यमंत्री असे कोणतेही घटनात्मक पद अस्तित्वात नाही. तो इतर मंत्र्यांसारखाच एक कॅबिनेट मंत्री असतो. त्याने तशीच शपथ घ्यायची असते. मात्र, गेल्या काही दशकांत 'उपमुख्यमंत्री' किंवा 'उपपंतप्रधान' म्हणून शपथ घेण्याची अनुचित प्रथा पडली आहे. तशीच शपथ फडणवीस यांनी घेतली. दैनंदिन कारभार हाकताना, मंत्रिमंडळातील निर्णय घेताना आणि राज्यभर फिरताना आपण 'उपमुख्यमंत्री' आहोत, ही जाणीव फडणवीस सतत मनाशी कशी बाळगतात, हे पाहावे लागेल. शिंदे यांचा शपथविधी होण्यापूर्वी भारतीय जनता पक्षात जे जाहीर नाट्य घडले, ते दिसते तितके साधे नाही. आपल्याकडे कशी कठोर शिस्त आहे, याचा कायम टेंभा मिरवणाऱ्या या पक्षाला महाराष्ट्रातील सर्वोच्च नेत्याचे विधान तासाभरात पुसून टाकावे लागते आणि त्याला शपथ घेण्यासाठी 'मनधरणी करून' तयार करावे लागते, ही बिनकाटेरी घडामोड नाही. आता खरा प्रश्न हे संयुक्त सरकार सुरळीत, कार्यक्षमतेने आणि भ्रष्टाचारमुक्त पद्धतीने चालविण्याचा आहे. ते तसे चालते का, हे कळेलच. अडीच वर्षे चालविलेले सरकार तुम्ही अखेर घालवले; आता पुढचा निम्मा काळ तुमचे सरकार नीट चालवून दाखवा, असेच कोणताही नागरिक म्हणेल. पूर्वी दिल्लीतील काँग्रेसश्रेष्ठी मनमानी करतात, अशी टीका व्हायची. त्याची फळे तो पक्ष भोगत आहे. भाजपमध्येही काही वेगळे होताना दिसत नाही. सुरत, गुवाहाटी, पणजी आणि मुंबई अशी 'चारी धाम' यात्रा करून झाल्यानंतर सत्तेत येताना नवे सरकार पहिल्याच पावलाला अडखळले आहे. त्याचा पुढचा प्रवास नीट होईल, अशी अपेक्षा आहे. नवे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना शुभेच्छा!

# उरण तालुक्यात दोन दिवसांपासून पावसाची जोरदार हजेरीने शेतीच्या कामांना वेग : बळीराजा सुखावला



**दै.रायगड नगरी । उरण**

यंदा जुनच्या महिनाभर दडी मारलेल्या पावसाने उरण तालुक्यात मागील दोन दिवसांपासून जोरदार हजेरी लावली आहे. पावसाच्या हजेरीमुळे महिन्यांपासून खोळंबलेल्या शेतीच्या कामांना वेग आला आहे. यामुळे येथील बळीराजा सुखावला आहे.

हवामान विभागाने जुनच्या पहिल्याच आठवड्यात जोरदार पाऊस पडणार असल्याचे भाकीत वर्तवले होते. त्यानंतर दोन – चार दिवस परिसरात पावसाचा हलक्या सरी तर कुठे रिमझिम पाऊस बरसला होता.

त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी शेतीच्या कामांना सुरुवात केली होती.खुरपणी, नांगरणी करून भात बियाणांची पेरणी केली होती.

मात्र मागील १५ ते २० दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने पेरण्यात आलेली भात बियाणे करपण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना पावसाची प्रतिक्षा लागुन होती.

सुमारे जुनच्या महिनाभर दडी मारलेल्या पावसाने उरण परिसरात बुधवारपासून मागील दोन दिवसांपासून जोरदार हजेरी लावली आहे.पावसाच्या हजेरीमुळे महिन्याभरापासून खोळंबलेल्या शेतीच्या कामांना वेग घेतला आहे. दोन दिवसांच्या पावसाने शेतात पाणी साचले आहे. त्यामुळे परिसरातील शेतकरी नांगरणीच्या कामात मग्न झाले आहेत. तर अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी पावसामुळे खोळंबलेल्या शेतीच्या कामांना सुरुवात केली आहे. उशिराने का होईना पावसाच्या आगमनाने परिसरातील शेतकरी सुखावला आहे.

# तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्राथमिक विद्यामंदिर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**दै.रायगड नगरी । तळा**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्राथमिक विद्यामंदिर मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम मुळे हे होते, तर व्यासपीठावर प्राथमिक विभागाचे चेअरमन किरण देशमुख, कार्यकारी मंडळांचे सदस्य डॉ. सतीश वडके, दीपक कोटिया, मारुती शिर्के, बी. के. पटेल, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य तथा माजी जिल्हा परिषद सदस्या नेत्रा देशमुख, ऋत्ता देशमुख, नगरसेवक प्रकाश गायकवाड हे होते.

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेमध्ये के. जी. टू पी. जी. अर्थात उच्च शिक्षणापर्यंत सुविधा आहे. या ठिकाणी नर्सरी पासून विद्यार्थी शिक्षण घेताना या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल, याकडे प्राथमिक विभागाचे चेअरमन किरण देशमुख यांचे सहकारी सदस्य व संस्थाचालक लक्ष देत आ–हेत. आज या ठिकाणी इ. १ ली. मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत तसेच शैक्षणिक साहित्याचे वाटप असा एकत्रितपणे कार्यक्रम घेत असताना पालक वर्गाची फार मोठ्या प्रमाणात उपस्थिती आहे, त्यांचा आनंद होत आहे. आपण सर्वांनी या शाळेवर विश्वास ठेवून आपल्या पाल्याचा प्रवेश या ठिकाणी घेतल्याबद्दल आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार. कारण हीच मुले या शाळेचा पाया असून भाग्यविधाते आहेत.

या शाळेतून शिकलेली अनेक मुले विविध क्षेत्रात आपल्या कर्तबदारीमुळे नावलौकिक प्राप्त झाली आहेत, त्यांचा आम्हा संस्थाचालकांना गर्व आहे. मध्यत्या काळात इंग्लिश मीडियमचे फॅड फार मोठ्या प्रमाणात होते, परंतु मराठी माध्यमांच्या शाळेत शिकलेली मुले देखील डॉक्टर, इंजिनियर, वकील तसेच शासकीय सेवेत कार्यरत आहेत. भारताचे माजी अर्थमंत्री व जागतिक कीर्तीचे थोर अर्थतज्ञ डॉ. सी. डी. देशमुख यांचे प्राथमिक शिक्षण तळ्याच्या जिल्हा परिषद शाळेत झाले असून, ते पहा कुठे गेले. असे मौलिक विचार अध्यक्ष पुरुषोत्तम मुळे यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक चेअरमन श्री. किरण देशमुख यांनी करताना शाळेचा आढावा घेत, आज प्राथमिक विभागात २०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तालुक्यात आपल्या शाळेत सर्वात जास्त विद्यार्थी शिकत असून सर्व शिक्षक उच्चशिक्षित आहेत. मुलांकडे आत्मियतेने लक्ष देतात. आलेल्या अडचणी सोडवितात. अगदी आपली मुले आहेत, अशा प्रकारे लक्षात घेत असतात. हे सर्व करीत असताना आपण हा पालकांचे मोठे सहकार्य आम्हाला लाभले त्याचे समाधान वाटते. शिक्षणाबरोबर क्रीडा स्पर्धा व शालेय उपयुक्त कार्यक्रमही घेत असतो, असे सांगितले.

# ट्रॅक्टर व मोटारसायकल अपघातात मोटारसायकल स्वार युवकाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी**

पाली खोपोली राज्यमहामार्गावर तिवरे गावाजवळ गुरुवारी (ता.३०) सायंकाळी ट्रॅक्टर व मोटारसायकल अपघातात मोटारसायकल स्वार युवकाचा जागीच मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार शैलेश पिसाळ असे या युवकाचे नाव असून तो सुधागड तालुक्यातील आंबिवली गावचा रहिवाशी आहे. पाली प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करून रात्री साडेआठ च्या सुमारास त्याचे शव घरी पाठवण्यात आले आहे.



### म्हसळा नगर पंचायत, म्हसळा

**जाहीर नोटीस**

**जा.क्र.म्हनपं/जाहीर नोटीस/ ८२५ / २०२२ दिनांक :- ०१/०७/२०२२**

महाराष्ट्र नगर परिषदा, म्हसळा नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने म्हसळा नगरपंचायतीस प्राप्त झालेल्या मालमत्ताधारकांच्याप्रकरणपरत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत हितसंबधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह म्हसळा नगर पंचायतीकडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा कर वसुलीच्या सोईसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपंचायत दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्रं | अनुसूची | अनुसूची पुस्तकातील क्रमांक / मालमत्ता क्रंमाक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | १८६ | दुर्गवाडी | कौलारू चिखल मातीत बांधलेले घर | दाजी धाकू बांद्रे | किशोर महादेव बांद्रे<br>शर्मिला दिनेश तावडे |
| २ | २ | १८८९ | काझी मोहल्ला | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत पहिला मजला फ्लॅट नं. १०२ | मेहताब महमद सलीम उकये | रिहाना अशफाक अहमद हमदारे |
| ३ | २ | १८५९ | काझी मोहल्ला | कमर्शियल कौलारू सिमेंट रेतीत बांधलेली शेड | इब्राहीम अलिमिया दोंदीलकर | नाजीमुद्दीन सैफुद्दीन चोगले |
| ४ | २ | ४७३ | काझी मोहल्ला | कौलारू चिखल मातीत बांधलेले सिमेंट रेतीत प्लास्टर केलेले घर | इब्राहीम अलिमिया दोंदीलकर | नाजीमुद्दीन सैफुद्दीन चोगले |
| ५ | २ | ८८९ | नवानगर | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत पहिला मजला फ्लॅट नं. १०१ | शाहिद अ. रहीम उकये | आसिफखान महमदखान पठाण |
| ६ | २ | ११४४ | उमर फारुख मोहल्ला | कौलारू सिमेंट रेतीत बांधलेले घर | अब्बासखान इस्माईलखान साने | मारियमबिबी अब्बासखान साने<br>नाझीम अब्बासखान साने<br>अकबर अब्बासखान साने<br>अखतरी जावेद शेख<br>सलीमा ईरुनि गोटेकर |

सही/- XXX
मुख्याधिकारी
म्हसळा नगरपंचायत

पृष्ठ क्र.१ वरुन...

# १९ वर्षीय तरुणीचा अपघात करून पळून जाणाऱ्या ट्रकचालकांना अटक

सीसीटीव्ही फुटेज चेक करून व वेळेचे गणित जुळवुन कंटेनर वरील सांकेतिक निशाणीचा अंदाज बांधून दोन्ही ट्रकचे क्रमांक व मूळ मालकाचे नाव निष्पन्न केले. तदनंतर दोन्ही ट्रेलर चालकांना ताब्यात घेतले असता त्यांनी चौकशीअंती गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांना अटक करण्यात आली. हा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी कोणताही दुवा नसताना फक्त सीसीटीव्हीच्या आधारे वेळेचे गणित जुळून अतिशय कौशल्याने सदरचा गुन्हा गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि संजय गळवे व डीबी पथकाने अहोरात्र मेहनत घेऊन गुन्हा उघडकीस आणलेला आहे. अधिक तपास सपोनि संजय गळवे करीत आहेत.

---

प्रो.जमा.६–२५ **अर्जदाराचे वकील**
**ॲड.सुलक्षणा द. जगदाळे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो.यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.४७७/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२६/०८/२०२२

१) श्रीमती.वैशाली प्रफुल्ल पटेल
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) प्रतिक प्रफुल्ल पटेल
दोघेही रा.टाईप II/19/427 आर.सी.एफ.,
चेंबुर मुंबई ४०००७२ अर्जदार

ज्याअर्थी कै.प्रफुल्ल वनमाळी पटेल यांची श्री राम आर्वे सदनिका क्र.१०१, ए विंग, १ ला मजला, प्लॉट नं.१८ ए, सेक्टर ७ कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची घर मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**श्री राम आर्वे सदनिका क्र.१०१, ए विंग, १ ला मजला, प्लॉट नं.१८ ए, सेक्टर ७, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड (क्षेत्रफळ ३५.१ चौ.मी.कारपेट, ओपन टेरेस १.६ चौ.मी.)**

श्री.प्रफुल्ल वनमाळी पटेल यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस असून त्या व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वरस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख १/०७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गुन्नाल साहेब
**वकील मनोज वारंगे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.८३९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०३/०८/२०२२

GEETA SHRIRAM DESHPANDE
Residing at : D-605, Balaji Aangan,
Plot No.I-1, Sector-03, Kharghar,
Navi Mumbai, Tal.-Panvel , Dist-Raigad अर्जदार

अर्जदार यांचे पती मयत कै.SHRIRAM MAHIPAT DESHPANDE राहणार डी–६०५ बालाजी आंगण प्लॉट नं. I–१, सेक्टर नं.०३ खारघर, नवी मुंबई, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड, यांचे दिनांक ९/०४/२०२१ रोजी एम.जी.एम न्यू. बॉम्बे हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई, येथे निधन झाले आणि सदर मयताचे नावे असलेली स्थावर मिळकत खालीलप्रमाणे :–

SCHEDULE OF PROPERTY
Flat No. 605, Building No. D, Balaji Aangan, Plot No.I-1, Sector-03, Belpada, Kharghar, Navi Mumbai, Taluka-Panvel, Dist-Raigad. Admeasuring 483 Sq.ft. Built - up area, 1/2 Share valued at Rs. 2,62,250/-

वरील मिळकत बाबत उक्त अर्जदार यांनी वारस दाखल मिळण्याकरिता अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वैगरे असल्यास त्यांनी तशी लेखी हरकत हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत ह्या न्यायालयात हजर होऊन दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून वारसदाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ०१/०७/२०२२ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

### गावदेवी विकास सामाजिक मंडळ, तुर्भे

नोंदणी क्र.महाराष्ट्र/६८/२०२२/रायगड
मु.तुर्भे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०८

**सहसचिव**
श्री.तुळशीराम धर्मा पाटील
**सहखजिनदार**
श्री.हरिश्चंद्र काना भोईर
**विश्वस्त**
श्री.रेवण काळू दवणे
श्री.गुरुनाथ बेडक्या भोईर
श्री.राम पुंडलिक म्हात्रे
श्री.रमेश नारायण मोकाशी
श्री.प्रल्हाद धर्मा पावशे
श्री.भालचंद्र झिपरु भोईर
श्री.गोविंद आंबो पाटील
श्री.मनिल दिनकर पाटील
श्री.भरत शांताराम पाटील

**जाहीर नोटीस**

मी गावदेवी विकास सामाजिक मंडळ, तुर्भे, ता.पनवेल, जि.रायगड ह्या संस्थेचा अध्यक्ष असून सदर संस्था १८६० च्या अधिनियमानुसार नोंदणी केली आहे. त्याचा नोंदणी क्र.महाराष्ट्र/६८/२०२२ रायगड असा आहे. तरी सदर मंडळाचा कोणाची हरकत असल्यास ०७ दिवसांच्या आत हरकत घ्यावी. अन्यथा कोणाची हरकत नसल्याचे समजण्यात येईल. सदर हरकत असल्यास गावदेवी विकास सामाजिक मंडळ, मु.तुर्भे, ता.पनवेल, जि.रायगड येथे कळवावी.

**सही/–**
**श्री.वामन दत्तात्रेय भोईर**
**अध्यक्ष**
गावदेवी विकास सामाजिक मंडळ, तुर्भे
ता.पनवेल, जि.रायगड

**सही/–**
**अध्यक्ष**
**श्री.वामन दत्तात्रेय भोईर**

**सही/–**
**उपाध्यक्ष**
**श्री.भास्कर गजानन तारे**

**सही/–**
**सचिव**
**श्री.नारायण नागो पाटील**

**सही/–**
**खजिनदार**
**श्री.सोमनाथ वासुदेव भोईर**

---

मा.गोडसे मॅडम
**वकील श्री.शशिकांत मुंढे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.९४०/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०३/०८/२०२२

श्री.जान्हवी एकनाथ म्हात्रे
वय : ७१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.ओवळे, पारगाव, तालुका : पनवेल,
जिल्हा : रायगड–४१०२०६ अर्जदार

ज्यापेक्षा मयत कै.एकनाथ राघो म्हात्रे यांचे दि.३०/०३/२०२० रोजी बामणडोंगरी, पोस्ट वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले. अर्जदार श्रीमती.जान्हवी एकनाथ म्हात्रे यांनी मयत यांच्या पत्नी या नात्याने कोर्टास सदरहू मयताचे कायदेशीर हक्कदार म्हणून अर्ज केला आहे. त्यांच्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | नोड | सेक्टर | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५१७ | ३७७ | १ | ०–२३–० | उलवे १ ब | २१ | ४६ | २०० चौ.मी. |
| | २५८ | ६ | ०–१७–५ | उलवे १ ब | २० | २६ | १५० चौ.मी. |
| | २६१ | ९ | | | – | – | – |
| ५१६ | २४७ | ५ | ०–०८–० | – | – | – | – |

सदर मिळकतीमध्ये मयत कै.एकनाथ राघो म्हात्रे यांचा १/५ एवढा कायदेशीर हक्क व अधिकार आहे.

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळविण्याबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाच्या दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास पनवेल येथील न्यायालयात लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत ह्या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न असल्यास अर्जदाराच्या विनंती प्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या रकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०१/०७/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# ग्राहकांची फसवणुक करणाऱ्या बिल्डरविरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलच्या वडघर येथील पुष्पक नोड मध्ये शिवालीक औरा या नावने इमारतीचे बांधकाम करणाऱ्या बांधकाम व्यावसायीकाने त्याच्याकडे फ्लॅटची बुकिंग करणाऱ्या ग्राहकांना फ्लॅट अथवा त्यांची रक्कम परत न केल्याने संबधित ग्राहकांनी या बांधकाम व्यावायीकाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी शिवालीक बिल्डर्स अँड डेव्हलपर्सचा मालक मुकेश श्रीनाथ शर्मा याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

शिवालीक बिल्डर्स अँड डेव्हलपर्सचा मालक मुकेश शर्मा याने दोन वर्षापुर्वी पनवेलच्या वडघर येथील पुष्पक नोडमध्ये शिवालीक औरा या नावाने इमारत उभारण्यात येत असल्याची जाहिरातबाजी केली होती. त्यावेळी अनेक लोकांनी या गृहप्रकल्पातील फ्लॅटची बुकिंग केली होती. वडाळा येथे राहाणाऱ्या निलेश भालकर व त्याच्या ओळखीतील विकास किसन मोरे या दोघांनी देखील गत वर्षी फ्लॅटची बुकिंग करुन बांधकाम व्यावसायीक मुकेश शर्मा याला अनुक्रमे ५ लाख व ६ लाख रुपये अशी ११ लाखाची रक्कम दिली होती. त्यावेळी बांधकाम व्यावसायिक मुकेश शर्मा याने लवकरात लवकर फ्लॅटचा ताबा देण्याचे आश्वासन बुकींग धारकांना दिले होते. त्यानंतर निलेश भालकर याने मुकेश शर्मा याला फ्लॅटचे रजिस्ट्रेशन करुन देण्यास सांगितले असता, त्याने वेगवेगळी कारणे सांगून वेळ मारुन नेली.

त्यानंतर गत फेब्रुवारी महिन्यात निलेश भालकर हा मुकेश शर्मा याच्या कामोठे येथील कार्यालयात गेला असता, सदरचे कार्यालय बंद असल्याचे त्याला आढळुन आले. त्याबाबत निलेशने अधिक चौकशी केली असता, त्याने अनेक ग्राहकांनाकडुन फ्लॅटच्या बुकिंग पोटी लाखो रुपये स्विकारुन त्यांना फ्लॅट अथवा त्यांची रक्कम परत न करता त्यांची फसवणुक केल्याचे आढळुन आले. तसेच मुकेश शर्मा याच्यावर कामोठे पोलीस ठाण्यात घर विक्री व्यवहारात फसवणुक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल असल्याची माहिती देखील निलेशला मिळाली. त्यानंतर निलेश भालकर व विकास मोरे या दोघांनी कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी शिवालीक बिल्डर्स अँड डेव्हलपर्स या कंपनीचा मालक मनोज शर्मा याच्या विरोधात फसवणुक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

## संक्षिप्त...

### मुरुडच्या छोट्या वारकऱ्याची पंढरपूर वारी

**दै.रायगड नगरी । मुरुड**

आषाढी एकादशीला दहा दिवसांचा कालावधी असताना मुरुडसह दिघी कुडगाव येथिल सुमारे तीनशेहून अधिक वारकरी आळंदीच्या भोपळे दिंडी क्र. १४ मध्ये सामील झाले आहेत.

या वारीत मुरुडच्या खारअंबोली गावांतील कु. चिंतन दिपेश पेरवे हा छोटा वारकरीही सामिल झाला आहे. मागील अनेक पिढ्या वारीची परंपरा चालवित असून भोपळे दिंडीचे नियोजन झेंडेकरी देविदास महाराज लोखंडे, अध्यक्ष माऊली महाराज लोखंडे, मुरुडचे भाई मिठागरी, अनंत पाटील, दिपेश पेरवे हे करीत असल्याने घरचे वातावरण अध्यात्मिक असल्याने छोटा चिंतन हा आपल्या आई वडिलांसह विठ्ठलाच्या दर्शनासाठी वारीत सहभागी झाला आहे. अध्यात्माचा हा वसा एका पीढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होण्याचे हे एक बोलके उदाहरण.



### मुरुडमध्ये भा.ज.पा.कार्यकर्त्यांचा जल्लोष

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

महाराष्ट्रात चाललेल्या राजकीय भूकंपाला पुर्णविराम लावत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिला. यामुळे महाराष्ट्रातील राजकारणाला नवीन वळण मिळाले आहे.मुरुड भाजपच्या शहर व तालुका पदाधिकाऱ्यांनी राज्य सरकार कोसळल्या नंतर शिंदे गटाने भा.ज.पा.ला सोबत घेऊन राज्यात सत्ता स्थापन केल्याबद्दल जल्लोष केला. राज्यातील भा.ज.पा.आमदारांचे संख्याबळ पाहता देवेंद्रजी फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची आस न धरता मनाचा मोठेपणा दाखवून बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसैनिकाला पाठिंबा दिला. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री आणि देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाले.शिंदे गटाला सोबत घेऊन भाजपने सत्ता स्थापन केली. त्याचाच उत्साह म्हणून भा.ज.पा.जिल्हा कार्यकारिणी सदस्य ज्येष्ठनेते जनार्दन सदाशिव तथा आण्णा कंधारे, तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर,संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर, उपाध्यक्ष बाळा भगत,परेश किल्लेकर,शहर अध्यक्ष उमेश माळी, महेश मानकर, अभिजित पानवलकर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

### बॉक्स क्रिकेट स्पर्धा संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कॅप क्लब आयोजित बॉक्स क्रिकेट स्पर्धा कर्नाळा स्पोर्ट्स अकादमी येथे संपन्न झाली. या स्पर्धेत मारवाडी जैन, मुस्लिम, कच्छी जैन, माहेश्वरी कच्छी, मेवाडी, बोहरी, मराठा, सिंधी, ख्रिस्ती, माहेश्वरी मारवाडी हे दहा समाज सहभागी झाले होते. या बॉक्स क्रिकेट स्पर्धेत मराठा समाज संघ विजयी झाला. तर मेवाडी जैन समाज संघ उपविजेता ठरला. या क्रिकेट स्पर्धेत श्री प्रल्हाद राय झुलेलाल ट्रस्टचे विशेष सहकार्य लाभले.

## एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाल्याने तळा सेना-भाजपने केला जल्लोष

**दै.रायगड नगरी । तळा**

महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ होणाऱ्यांचे संकेत गेले पंधरा दिवसापासून कोळून निघत असताना ३०जुन गुरूपुष्यामृताच्या शुभ मुहूर्तावर सांय.७.३०वा. स्व.बाळासाहेब ठाकरे व आनंद दिघे यांचेस्मरण करून मुख्यमंत्री पदाची व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतली तळा सेना, भाजपात आनंद झाला असून सेनेने बस स्टॅन्ड परिसरात शहरात मोठा जल्लोष साजरा केला.

फटाक्यांची आतष बाजी एकमेकांना पेढे वाटून साजरा केला तर घरोघरी पेढे वाटून आनंद साजरा केला. तर भाजप ने बळीच्या नाक्यावर फटाके फोडून जल्लोष साजरा केला. भाजपकडे संख्या बळ अधिक असताना भाजपने स्व.बाळासाहेब यांच्या स्वप्नाची पुर्तता केली विरोधकांना देखील असे घडेल याची यत्किंचितही कल्पना नव्हती हा मोठा इतिहास घडवला आहे. महाविकास आघाडीत चाललेला सावळ्या गोधंळाला राज्यातील जनता त्रस्त झाली होती विकास खुंटला होता. आता या सरकारकडून जनतेच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. यावेळी भाजप यूवा प्रमुख नगरसेवक रितेश मुंढे व दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी वरंध घाट वाहतुकीसाठी बंद

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोकणाला पश्चिम महाराष्ट्राशी जोडणारा सर्वात जुना मार्ग असलेल्या महाड–भोर, पुणे–पंढरपूर रस्त्यावरील वरंध घाट अवजड वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. महाड–पुणे मार्गावरील वरंध घाट पावसाळा व दरडी यामुळे धोकादायक ठरत आहे. दि.२९ जून २०२२ रोजी दरड कोसळल्यानंतर पुढील धोका टाळण्यासाठी अतिवृष्टीच्या काळात वरंध घाट दि.३० जून २०२२ पासून पुढील तीन महिने अवजड वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे.

सध्या जिल्ह्यात सर्वत्र संततधार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे वरंध घाट क्षेत्रात दरडी कोसळण्याची भीती आहे. तसेच रस्ता खचण्याची शक्यता लक्षात घेऊन व पुढील धोकादायक परिस्थिती टाळण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी दि.०१ जुलै ते दि.३० सप्टेंबर २०२२ या कालावधीत दुरुस्तीच्या व पावसाळा कालावधीतील अतिवृष्टीच्या वेळी कुठलाही अपघात होवू नये याकरिता अवजड वाहतूकीकरिता व जिल्ह्यात भारतीय हवामान विभागाच्या यलो, ऑरेंज व रेड इशाऱ्याच्यावेळी सर्व प्रकारच्या वाहतूकीकरिता घाट रस्ता बंद ठेवण्याबाबतची अधिसूचना जारी केली आहे. या मार्गावरील वाहतूक पुण्याकडे जाण्यासाठी महाड–माणगाव–निजामपूर–ताम्हिणी घाट–मुळशी–पिरंगुट–पुणे तसेच कोल्हापूरकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा–पोलादपूर–खेड–चिपळूण–पाटण–कराड–कोल्हापूर या पर्यायी मार्गाने मार्गस्थ करण्याबाबतचेही आदेश जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी जारी केले आहेत.

## पनवेल आणि खारघर मधील धबधब्यांवर जाण्यासाठी पर्यटकांना जाण्यास मनाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल आणि खारघर मधील धबधब्यांवर तसेच धरणांवर दुर्घटना घडत असल्याने या धबधब्यांवर आणि धरणावर जाण्यासाठी पर्यटकांना जाण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी पावसाळ्यात धबधब्याजवळ जाऊ नये, असे आवाहन परिमंडळ– २ चे पोलीस उपआयुक्त शिवराज पाटील यांनी केले आहे.

महाराष्ट्रात सध्या पावसाने जोर धरला असला तरी खरा पाऊस जुलै महिन्यात होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत अनेकवेळा पर्यटक विशेषत:तरुणवर्ग पनवेल आणि खारघर भागातील धबधबा तसेच धरणांजवळ मौज–मजा करण्यासाठी जात असतात, मात्रकाहीवेळेला ते सदर ठिकाणी दुर्घटना होऊन आपला जीव गमावून बसतात. जेव्हा मुसळधार पाऊस पडतो, तेव्हा धबधब्याच्या पाण्यात प्रचंड वाढ होते. अशा परिस्थितीत अनेक तरुण नशा करुन धबधब्याखाली जातात आणि आपला जीव गमावतात. गेल्या काही वर्षामध्ये पनवेल आणि खारघर मधील धबधब्यांवर अशा अनेक घटना घडलेल्या आहेत. खारघर व्यतिरिक्त पनवेलमध्ये अनेक छोटे–छोटे धबधबे आणि धरण आहेत.

या धबधब्यावर मौज–मजा करण्यासाठी दरवर्षी पावसाळ्यात मोठ्या संख्येने पर्यटक जात असतात. त्यामुळे या धबधब्यांचे मुख्य रस्ते बंद ठेवण्यात आले आहेत. असे असले तरी अनेक तरुण दुसऱ्या मार्गाने डोंगराळ भागातून धबधब्याजवळ जात असतात. अनेक वेळा काही तरुण दिवसा उजेडात जातात, त्यानंतर ते रात्रीच्या अंधारात हरवून जातात. त्यानंतर त्यांना शोधण्यासाठी पोलिसांना जावे लागते. त्यामुळे सर्व धबधब्याच्या ठिकाणी पोलीस तैनात करण्यात आले असून धबधब्याजवळ पर्यटक पोहोचू शकतील अशा सर्व मार्गांवर पोलीस लक्ष ठेवून आहेत. जर कोणी पोलिसांना चकवा देण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्यामुळे नागरिकांनी पावसाळ्यात धबधब्यावर जाऊ नये, असे आवाहन पोलीस उपआयुक्त शिवराज पाटील यांनी केले आहे.



## ज्ञान प्रदाय शिक्षण संस्था आंबेवाडी कोलाड येथे डान्स अकॅडमीचे उदघाटन संपन्न

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

ज्ञान प्रदाय शिक्षण संस्था आंबेवाडी कोलाड यांचे माध्यमातून शिरीष अनप्लग संगीत अकॅडमी पुरस्कृत स्थानिक मुलांसाठी डान्स अकॅडमी सुरु करुन दालन उपलब्ध करून देण्याचे काम शिरीष शिवराम महाबळे व रॉनि पठार यांच्या माध्यमातून सुरु करण्यात आले आहे.

या डान्स अकॅडमीचे उदघाटन कुणबी युवक तथा कोलाड रोहा लायन्स क्लबचे अध्यक्ष प्रो.डॉ.सागर सानप (बी.एन.एन. कॉलेज भिवंडी) तसेच ज्ञान प्रदाय शिक्षण संस्थेचे संस्थापक शिवरामजी महाबळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. शिक्षणा बरोबरच विद्यार्थ्यांच्या कळागुणांना वाव मिळावा यासाठी या डान्स अकॅडमी सुरु करण्यात आली असल्याचे मत संस्थेचे संस्थापक शिवरामजी महाबळे यांनी व्यक्त केले.


मा.गोडसे साो

**वकील श्री.मितुल चं. लव्हेकर**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील सह दिवाणी न्यायालय व.स्तर मा.ए.ए.गोडसे साो.पनवेल यांचे कोर्टात

स्पे.दरखास्त क्र.१७/२०२२
नि.नं.१२/ड
ने.ता.०१/०८/२०२२

श्री.रोहन प्रभाकर बच्चेवार — दरखास्तदार (डी.एच.)
विरुद्ध
श्री.इस्माईल सुलेमान शेख व इतर — सामनेवाले (जे.डी.)

प्रति,
१) श्री.इस्माईल सुलेमान शेख
२) श्री.कासम सुलेमान शेख
३) श्री.हसनमिया सुलेमान शेख
रा.मु.पो.ओवे, तालुका : पनवेल, जि.रायगड
४) श्री.एम.जी.सदाशिवन
पत्ता : ट्वीन्स कॉर्नर शॉप नं.२१, प्लॉट नं.०१, सेक्टर १७, नेरुळ नवी मुंबई

वरील अर्जदार श्री.रोहन प्रभाकर बच्चेवार ह्यांनी स्पे.दरखस्त पनवेल येथील दिवाणी न्यायालय व.स्त. यांचे कोर्टात वर नमूद सामनेवाला श्री.इस्माईल सुलेमान शेख व इतर यांच्या विरुद्ध दाखल केलेला आहे. सदरच्या स्पे.दरखास्तमध्ये वर नमूद १) श्री.इस्माईल सुलेमान शेख, २) श्री.कासम सुलेमान शेख, ३) श्री.हसनमिया सुलेमान शेख, ४) श्री.एम.जी.सदाशिवन यांना सामनेवाला क्र.१, २, ३ व ५ बनविण्यात आले आहे. आपल्याला पारंपारिक पद्धतीने नोटीसीची बजावणी करता येत नसल्यामुळे वैकल्पिक सर्व्हिसचा वापर करत आहोत.

सदरचा स्पे.दरखास्त अर्जदाराने तुमच्या आणि अन्य इसमांच्या विरुद्ध दाखल केलेला आहे. तसेच आपल्याला सदरचे नोटीस बजाविण्यात येत आहे.

तरी आपण स्वतः किंवा वकीलामार्फत आपली बाजू मांडण्याकरिता दि.०१/०८/२०२२ रोजी सकाळी १०.वा. ३० मि. न्यायालयात हजर रहावे. तसेच आपण आपल्या म्हणणे मे.न्यायालयात सर्व कागदपत्रांसहीत दाखल करावे.

तसेच सदरच्या नोटीसीची आपण गांभीर्याने दखल घेवून मे.न्यायालयात आपले म्हणणे सर्व कागदपत्रांसहीत दाखल करावे. जर आपण मे.न्यायालयात सर्व कागदपत्रांसहीत हजर राहण्यास असमर्थ राहिल्यास आपल्या विरुद्ध सदरचा स्पे.दरखास्त एकतर्फी चालविण्याचा आदेश पारित होईल याची आपण नोंद घ्यावी.

आज दि.०१/०७/२०२२ रोजी माझ्या सही आणि शिक्क्यासहीत देण्यात येत आहे.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**



पालदेवकर साहेब

**अर्जदारातर्फे वकील**
**ॲड.भुषण म्हात्रे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.५३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०४/०८/२०२२

श्रीमती.दर्शना सुरेश कडू,
वय : ३५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बेलपाडा, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते कि, कुमारी.हंसिका सुरेश कडू, कुमारी.स्नेहा सुरेश कडू, कुमारी. मनाली सुरेश कडू व कुमार हार्दिक सुरेश कडू, रा. मौजे, बेलपाडा पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड राहत असून ते अज्ञान असून वरील अर्जदार यांचे व अज्ञान यांचा हिस्सा असलेल्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| गाव | स.नं. व हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| गव्हाण | ३१९/४/ब/५ | ०.१२.९० 0.00.८० एकूण ०.१३.७० | २.३४ |

मध्ये अज्ञानाचा व इतर सज्ञान यांचा १/५ क्षेत्राचा हिस्सा असून श्रीमती. दर्शना सुरेश कडू हिला कुमारी. हंसिका सुरेश कडू, कुमारी. स्नेहा सुरेश कडू, कुमारी. मनाली सुरेश कडू व कुमार हार्दिक सुरेश कडू हिचे पालन कर्ती म्हणून नेमणूक करून मिळावी तसेच अज्ञानाचा पालनकर्ती श्रीमती. दर्शना सुरेश कडू अज्ञानांची आई हिला अज्ञानांची स्थावर मिळकत विक्री करण्याबाबत परवानगी मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

सदरहू अर्जदार या कुमारी. हंसिका सुरेश कडू, कुमारी. स्नेहा सुरेश कडू, कुमारी. मनाली सुरेश कडू व कुमार हार्दिक सुरेश कडू यांची अज्ञान पालनकर्ती आई नाही असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीस प्रसिद्धेच्या तारखे पासून ३० दिवसाच्या आत ह्या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्रीमती.दर्शना सुरेश कडू ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि त्यांना कुमारी. हंसिका सुरेश कडू, कुमारी. स्नेहा सुरेश कडू, कुमारी. मनाली सुरेश कडू व कुमार हार्दिक सुरेश कडू यांचे हिश्श्यास येणाऱ्या मिळकतीचे नैसर्गिक पालनकर्ता म्हणून घोषित करण्यात येईल व त्याची अज्ञान पालनकर्ता म्हणून नेमणूक करून त्याच्या हिश्श्याची मिळकत विक्री करता येईल तसेच त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ०१/०७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली

**सही/– क.लिपीक अति.जि.न्याया.पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/– सहा.अधिक्षक अति.जि.न्याया.पनवेल**



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत माझे अशिलाने कायम खरेदीखत करून प्रस्ताविक जमीन मालक १) हिराबाई काशिनाथ पाटील, २) नर्मदा काथोड शेळके, ३) श्री.रमेश गोपाळ धोंगडे, ४) विठाबाई अनंत मुंबईकर, ५) श्री.सुभाष काथोर शेळके, ६) ताईबाई रामचंद्र पाटील, ७) श्री.दत्तात्रेय काथोर शेळके, ८) श्री.पांडुरंग विठ्ठल उर्फ विठू शेळके, ९) कमलाबाई केशव पाटील, १०) अशोक गोपाळ धांगडे या जमीन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : आदई, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| आदई | ११३/१/ब | ०–१५–१० पो.ख. ०–०१–०० एकूण ०–१६–१० | १.६१ |
| आदई | ११३/१/अ | ०–२२–४० पो.ख. ०–०१–०० एकूण ०–२३–४० | २.३४ |
| आदई | १०४/२ | ०–२०–३० पो.ख. ०–०१–७० एकूण ०–२२–०० | ४.६७ |
| आदई | ११३/२/ड | ०–२१–७० पो.ख. ०–०३–३० एकूण ०–२५–०० | ४.७७ |
| एकूण जमीन मिळकत ०–८६–५० हे.आर.पॉ.बाबत सदर जाहीर नोटीस | | | |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार–मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि.०१/०७/२०२२

**सही/–**
**ॲड.श्री.दिपक आर. शेळके**
**डी–३/१, किनारा हौ.सो., बावन बंगला,**
**ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६**
**मो.नं.९८२०७९५६०५**



मा.गुन्नाल साहेब कोर्ट

**अर्जदारातर्फे वकील**
**सौ.तनुजा मोकल**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.८१/२०२२
नि.नं.१२/ड
ने.ता.२५/०७/२०२२

१) श्रीमती.सुनंदा लक्ष्मण घरत (पत्नी)
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.५४७, कोपर, घरत आळी,
पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.स्मिता कुंदन मोकल (मुलगा)
वय : २८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.२८९, न्हावेखाडी, मधला पाडा,
ता.पनवेल, जि.रायगड
३) श्वेता लक्ष्मण घरत
विवाहानंतरचे नाव
सौ.श्वेता कुणाल ठाकूर (मुलगी)
वय : २५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.धुतूम, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.लक्ष्मण काशिनाथ उर्फ काशा घरत हे मु.कोपर, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत होते व ते दि.१९/०१/२०२१ रोजी मु.कोपर, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार यांना ते कै. लक्ष्मण काशिनाथ उर्फ काशा घरत यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

कै.लक्ष्मण काशिनाथ उर्फ काशा घरत यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**(मौजे : गव्हाण व मौजे : खारकोपर, ता.पनवेल, जि.रायगड येथील)**

| अ.क्र. | मौजे–गाव | युनिट केस नं. | सर्व्हे/हिस्सा | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | गव्हाण | ७१ | ८९/११ | ०–३–१२ |
| | | | ८९/९ | ०–१–१२ |
| | | | ७०/३ | ०–२०–८ |
| | | | ६८/१ | ०–३४–४ |
| | | | ९०/५ | ०–२–० |
| | | | ६८/३ | ०–१३–१ |
| २ | गव्हाण | ८२८ | ६८/२ | ०–१४–० |
| ३ | खारकोपर | ८ | ७/१० | ०–१५–० |

वरील अर्जदार हे मयत कै.लक्ष्मण काशिनाथ उर्फ काशा घरत यांचे कायदेशीर वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.लक्ष्मण काशिनाथ उर्फ काशा घरत, यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यास वारसदाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि.१/०७/२०२२ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## पनवेलची कु.पलक आनंद बागडे ठरली मिस शायनिंग स्टार २०२२ ची मानकरी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

डीपीएस पनवेल येथील १२ वी ची विद्यार्थीनी नुकतीच मिस शायनिंग स्टार २०२२ हि पदवी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

आग्रा येथे स्टारलाईफ पेजेंटने आयोजित केलेल्या अखिल भारतीय स्तरावरील स्पर्धेत नवी मुंबई पनवेल येथील डीपीएस पनवेल १२ वी ची विद्यार्थीनी कु. पलक आनंद बागडे हिला मिस टीन इंडिया २०२२ अंतर्गत मिस शायनिंग स्टार २०२२ ही पदवी प्रदान करण्यात आली. यात ४० स्पर्धक सहभागी झाले होते. यात परिक्षत म्हणून डॉ.सागर अबिचंदानी (स्माईल स्पेशालिस्ट), श्वेता सिंग चौधरी (मिसेस इंडिया वर्ल्ड २०१९), हर्ष खुल्लर (मिसेस इंडिया वर्ल्ड २०१९), हर्ष खुल्लर (फॅशन डिझायन) आणि अंकित नागपाल आदींनी कामकाज पाहिले. पलक आनंद बागडे ही मिस शायनिंग स्टार २०२२ ठरल्याबद्दल तिचे अनेक स्तरातून कौतुक होत आहे.

## कचेरी रोड रिक्षा स्टँण्ड येथे मनमोहक छोटेसे साईं मंदिराची स्थापना

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

रिक्षा चालक मालक संघटना माणगांव च्या वैद्य हॉस्पिटल समोरील रिक्षा स्टँण्ड जवळील नामफलकाचे जागेत संघटनेच्या सर्व सदस्यांचे इच्छेनुसार गुरुवार दि. ३० जुन रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता माणगांव मधिल युवा सामाजिक कार्यकर्ते निलेश थोरे यांच्या सौजन्यातुन मोठ्या भक्तीभावाने छोटस साई मंदिर स्थापित करुन यामध्ये साईं बाबांच्या मनमोहक मुर्तिची प्रतिष्ठापना निलेश थोरे यांच्या शुभहस्ते भक्तीपूर्ण वातावरणात केली.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांचे रिक्षा संघटनेच्या वतिने अध्यक्ष मढवी यांनी गुलाबपुष्प देऊन स्वागत करुन समाधान व्यक्त केले. सर्वांनी साईंचे दर्शन घेताच प्रसाद वाटपही करण्यात आला. यावेळी माजी उपसरपंच अनंता थळकर, रायगड भूषण रविंद्र कुवेसकर, रिक्षा चालक मालक संघटनेचे येथिल विभागिय अध्यक्ष चंद्रकांत मढवी तसेच सदस्य दौलत मोरे, मंचक कांबळे, मुख्तियार माटवणकर, शशिकांत जठार, प्रकाश शेलार तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.



### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# श्रीवर्धन तहसील कार्यालयात आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी – नैसर्गिक आपत्तीचा सक्षमपणे सामना करणे गरजेचे असते. नैसर्गिक आपत्तीचे आ–पत्तीपूर्व आणि आपत्ती पश्चात योग्य नियोजन केल्यास आपत्तीचे निर्मूलन करणे सोपे जाते. गेल्या दोन वर्षात आपण विविध नैसर्गिक आ–पत्तींना सामोरे गेलो आहोत. निसर्ग चक्रीवादळ , तोक्ते चक्रीवादळ, कोरोना या नैसर्गिक आपत्तींनी आपणास भरपूर काही शिकवला आहे. नैसर्गिक आपत्तीचे निराकरण करण्यासाठी प्रशासन सज्ञ आहे असे प्रतिपादन श्रीवर्धन चे प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी केले आहे.

श्रीवर्धन तहसील कार्यालयात आपत्ती व्यवस्थापना बाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले. सदर प्रसंगी श्रीवर्धन तालुक्यातील विविध प्रशासकीय यंत्रणेच्या प्रमुखांना नैसर्गिक आपत्ती बाबत प्रांताधिकारी यांनी मार्गदर्शन केले. प्रांताधिकारी अमित शेडगे म्हणाले आपल्या विभागात मोठ्या स्वरूपात पाऊस पडतो.



परिणाम स्वरूप दरड कोसळणे , दळणवळ–णात बाधा निर्माण होणे, विद्युत पुरवठा खंडित होणे, रस्त्यावर काही भागात पाणी साचणे, दाट वृक्ष लता असणाऱ्या भागात झाडे कोसळणे या प्रकारच्या विविध नैसर्गिक आपत्ती निर्माण होतात. या आपत्तीमुळे सर्वसामान्य जनतेला त्रास होणार नाही या दृष्टिकोनातून प्रशासनाने तत्परतेने काम करणे अभिप्रेत आहे.

> तालुक्यातील जनतेने नैसर्गिक आपत्ती प्रसंगी मदत व दुर्घटनेच्या माहिती संदर्भात तहसील कार्यालयात ७२४९५७९१५८व९२८४७३०७५३ या दूरध्वनी नंबर वरती संपर्क साधावा. आपत्ती कक्ष सदैव मदतीसाठी सज्ज आहे.
>
> **- सचिन गोसावी तहसीलदार श्रीवर्धन**
>
> श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीतील दरड प्रवण क्षेत्रातील रहिवाशांनी नैसर्गिक आपत्ती योग्य काळजी घ्यावी.
>
> मदत लागल्यास तात्काळ तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा.
>
> **- विराज लबडे मुख्याधिकारी श्रीवर्धन**

रायगडचे जिल्हाधिकारी डॉ महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार श्रीवर्धन तहसील कार्यालयात आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. तालुक्यातील प्रत्येक नागरिकाला नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी मदत करण्यासाठी व आपत्तीच्या अनुषंगाने सूचना देण्यासाठी प्रशासनाने कक्षाची स्थापना केली आहे. प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी जनतेला सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. सदरच्या आढावा बैठकीसाठी श्रीवर्धन तहसीलदार सचिन गोसावी , नायब तहसीलदार प्रथमेश भुर्के , नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विराज लबडे,सहाय्यक पोलीस निरीक्षक उमेश खिराड, सार्वजनिक बांधकाम खात्याचे अभियंता प्रसन्नकुमार राऊत तसेच इतर आस्थापनांचे प्रमुख उपस्थित होते.

## नेहा व प्रशांत पाटील दांपत्याकडून पेण पत्रकारांना विमा पॉलिसी भेट

**दै.रायगड नगरी । पेण**

आंबिवली सरपंच नेहा प्रशांत पाटील व सदस्य प्रशांत पाटील या दांपत्याने पेण पत्रकारांसाठी पाच लाख रुपयांची विमा पॉलिसी काढली ही बाब कौतुकास्पद आहे. त्यांनी पेणच्या पत्रकारांबाबत जी सकारात्मक भूमिका घेतली आहे त्याचा आदर्श इतर तालुक्यातील लोकप्रतिनिधी यांनी घेतला पाहिजे.पेणच्या पत्रकारांनी नेहमीच चांगले कार्यक्रम राबविले आहेत. अशीच एकजूट ठेऊन एक आदर्श निर्माण करावा. असे आवाहन रायगड प्रेस क्लब अध्यक्ष भारत रांजणकर यांनी पेण येथे पत्रकारांना विमा पॉलिसी वाटप कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना केले.

आंबिवली सरपंच नेहा प्रशांत पाटील व उद्योजक, ग्रामपंचायत सदस्य प्रशांत पाटील या दांपत्याच्या सौजन्याने पाच लाख रुपयांची विमा पॉलिसी काढण्यात आली होती. त्याचे वाटप गांधी वाचनालय सभागृहात करण्यात आले. यावेळी रायगड प्रेस क्लब अध्यक्ष भारत रांजणकर, आंबिवली सरपंच नेहा पाटील, सदस्य प्रशांत पाटील, जेष्ठ पत्रकार सूर्यकांत पाटील,मराठी पत्रकार परिषदेचे कोकण विभाग सचिव विजय मोकल, पेण प्रेस क्लबचे अध्यक्ष देवा पेरवी,पत्रकार तथा



नगरसेवक संतोष पाटील, ओरिएंटल इन्श–रन्स कंपनीचे उदय काटे ,शरद यादव , ज्येष्ठ पत्रकार बाळ सिंगासने, जेष्ठ पत्रकार दत्ता म्हात्रे,कमलेश ठाकूर, नरेश पवार, स्वप्निल पाटील, राजेश कांबळे,विनायक पाटील, रुपेश गोडिवले, प्रमोद मोकल, दीपक लोके, अनिस मणियार, राजेश प्रधान, सुनिल पाटील, गणेश पाटील,किरण बांधणकर, प्रशांत पोतदार, प्रदीप मोकल, सुभाष टेंबे, एजाज मणियार, संतोष पाटील, धनाजी घरत, प्रकाश माळी, आदीसह पत्रकार उपस्थित होते.

पत्रकार हा समाजाचा जागरुक पहारेकरी असतो खरा, परंतु त्याला अनेकदा जीव धोक्यात घालून वार्तांकन करावे लागते. तर बऱ्याचदा त्याला विविध समस्यांशी सामना करावा लागतो. एखादी घटना घडल्यास त्याला तातडीने घटनास्थळी पोहोचावे लागते.

कधी त्याला त्याच्या धाडसी कामाचे कौतुक होते तर कधी दोषही ओढवून घ्यावे लागते. त्यातूनच हल्ले होण्याचे प्रकारही घडतात. या सगळ्या फेऱ्यातून जाताना त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या संरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर उभा रिहातो. ही काळजी करुन आंबिवली येथील उद्योजक प्रशांत पाटील आणि सरपंच नेहा पटील यांनी पाच लाखांचा विमा उतरवून मोठे संरक्षण दिले आसल्याचे जेष्ठ पत्रकार सुर्यकांत पाटील यांनी या वेळी सांगितले. यावेळी सूर्यकांत पाटील, संतोष पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष टेंबे यांनी केले तर आभार कमलेश ठाकूर यांनी मानले.

## शांताराम मोरे सेवा निवृत्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खान्देश्वर स्थानकाचे प्रबंधक शांताराम मोरे आपल्या प्रदीर्घ कालावधीतून सेवा निवृत्त झाले आहे. खांदेश्वर रेल्वे स्थानकातील अधिकारी व कर्मचारी यांनी या निमित्ताने शांताराम मोरे यांच्या सेवा निवृत्तीचा छोटेखानी कार्यक्रम आयोजित केला होता.

शांताराम नारायण मोरे ३६ वर्षांपूर्वी रेल्वे विभागात नोकरी ला लागले त्या नंतर कंलबोली गुड्स डेपो, जे एन पी टी गुड्स डेपो आशा अनेक मोठ्या पदांवर कार्यरत होते. रेल्वे खात्यातील सर्व कर्मचाऱ्यांशी मनमिळावू राहून आनंदात काम करत प्रामाणिकपणे आपल्या नोकरीचे ३६ वर्ष पूर्ण केले. सध्या ते खांदेश्वर रेल्वे स्टेशन मध्ये स्टेशन मॅनेजर या पदावर काम करत सेवा काळ पूर्ण करुन निवृत्त झाले. शांताराम नारायण मोरे यांच्या सेवानिवृत्ती च्या कार्यक्रम खांदेश्वर रेल्वे स्थानकातील अधिकारी व कर्मचारी यांनी आयोजित केला होता. कार्यक्रमादरम्यान पुढील आयुष्य निरोगी राहो आशा शुभेच्छा सर्व कर्मचारी व सहकाऱ्यांनी त्यांना दिल्या या वेळी भावी स्टेशन प्रबंधक (वाणिज्य) अनिल बारटक्के, धनंजय सुरालकर, बेनहर विक्टर, सुदेशना जाधव, अक्षता बेले, ध्रुव जयप्रकाश, विशाल लोखंडे, कैलास सोनार, महाले, मणी पिल्ले, प्रवीण गोरे, जगदीश बैरवा आदि अधिकारी कर्मचारी वर्ग उपस्थित होते.



# मनोहरशेठ भोईर व शिवसेना तालुका प्रमुख संतोष ठाकूर यांच्या पाठपुराव्याला यश

**दै.रायगड नगरी । उरण**

शिवसेना जे बोलते ते करून दाखवते. याचा प्रत्यक्ष अनुभव चिरनेर गावातील ग्रामस्थांना आला आहे. माजी आमदार व शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख मनोहरशेठ भोईर हे चिरनेर ग्रामस्थाचे ग्रामदैवत असणारे बापुजीदेव मंदीरच्या सभामंडपाच्या उद्घाटन प्रसंगी आले असता शिवसेना तालुका प्रमुख संतोष ठाकूर व शिवसेना व युवासेना शाखा चिरनेर–भोम व सर्व शिवसैनिकांनी माजी आमदार व शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख मनोहरशेठ भोईर यांच्याकडे चिरनेर परिसर व चिरनेर गावाच्या विकासासाठी विकासनिधीची मागणी केली असता सदर चिरनेर गावाच्या विकासासाठी विविध कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याच्या शब्द चिरनेर ग्रामस्थाचे ग्रामदैवत असणारे बापुजी देवासमोर दिला होता. तो शब्द त्यांनी युवासेनाप्रमुख, शिवसेना नेते व पर्यावरण,



पर्यटन मंत्री आदित्यजी ठाकरे यांना प्रत्यक्ष भेटून व पत्र व्यवहार करुन खालील विविध कामांसाठी एकूण रुपये ४,३५,००,०००/–(अक्षरी रुपये चार कोटी पस्तीस लाख मात्र) निधी मंजूर करुन माजी आमदार व शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड मनोहरशेठ भोईर यांनी चिरनेर महागणपती वर त्यांची आसणारी श्रध्दा व चिरनेर गावावर असलेले त्यांचे प्रेम दाखवून दिले आहे. या पैकी पहिल्या टप्प्यात खालील कामे मंजूर झाली आहेत. १.बहुद्देशिय सभाग्रुहासाठी ३० लाख रुपये २.चिरनेर रांजणपाडा रंगमंचासाठी १२ लाख रुपये ३.चिरनेर बौध्दवाडा ते महागणपती मंदीरापर्यंत रस्ता १५ लाख रुपये ४.भोम कमान ते महागणपती मंदीरापर्यंत रस्ता ५३ लाख रुपये ५.बापुजी देव मंदिर सुशोभिकरणासाठी ८ लाख रुपये ६.बापुजी देव मंदीर परिसर विद्युतीकरणासाठी ५ लाख रुपये ७.चिरनेर साईनगर कडे जाणार्या रस्त्यासाठी ९ लाख रुपये. सदरच्या कामांसाठी भरघोस निधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल युवासेनाप्रमुख,शिवसेना नेते व पर्यावरण,पर्यटन मंत्री आदित्यजी ठाकरे व माजी आमदार व शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख मनोहरशेठ भोईर व तालुका प्रमुख संतोष ठाकूर यांचे शिवसेना व युवासेना शाखा चिरनेर–भोम व सर्व चिरनेर ग्रामस्थांच्या वतीने मनःपुर्वक आभार मानण्यात आले आहे.

# खालापूर तालुक्यातील पर्यटन स्थळे व परिसरात कलम १४४ लागू

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक कर्जत तालुक्यातील धबधबे किंवा तलावाच्या ठिकाणी येतात व दुर्दैवाने काही प्रमाणात जीवितहानी होण्याच्या घटना घडतात. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच धबधबा, धरण व तलाव क्षेत्रात कोणत्याही प्रकारे जीवितहानी होवू नये, याकरिता खालापूर तालुक्यातील धामणी कातकरवाडी तलाव, बोरगाव धबधबा, पोखरवाडी बंधारा–बोरगाव, झेनिथ धबधबा व परिसर, आडोशी धबधबा व परिसर, आडोशी पाझर तलाव, मोरबे धरण, नढाळ/वरोसे धरण, पळसाचा बंधारा (टेपाचीवाडी नढाळ), वावर्ले बंधारा, डोणवत धरण, कलोते धरण, माडप धबधबा, भिलवले धरण या गजबजलेल्या पर्यटनस्थळांच्या ठिकाणी व त्यांच्या १ कि.मी. परिसरात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) नुसार पावसामुळे निर्माण झा–लेले नैसर्गिक धबधब्याच्या परिसरामध्ये मद्यपान करण्यास किंवा मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतूक करणे, अनधिकृत मद्य विक्री करणे व उघड्यावर मद्य सेवन करणे, पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे,धबधबे, दऱ्यांचे कठडे, धोकादायक वळणे इ.ठिकाणी सेल्फी काढण्यास व कोणत्याही स्वरु–पाचे चित्रीकरण करणे तसेच रहदारीवर परिणाम करणाऱ्या ठिकाणी फोटोग्राफी करणे, पावसामुळे वेगाने वाहणाऱ्या पाण्यात, खोलपाण्यात उतरणे व त्यामध्ये पोहणे. धबधब्यावर जाणे अथवा पाण्याच्या प्रवाहाखाली करणे. सायंकाळी ६.०० वाजल्यानंतर ते सकाळी ६.०० वाजेपर्यंत या कालावधीत धबधबे किंवा तलाव या ठिकाणी पाण्यात उतरणे. वाहतुकीचे रस्ते तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबविणे, वाहन अतिवेगाने चालविणे तसेच वाहतूकीस परिणाम, अडथळा होईल, अशा प्रकारे वाहन चालविणे. वाहनाची ने–आण करताना बेदरकारपणे वाहन चालवून इतर वाहनांना धोकादायक स्थिती ओव्हरटेक करणे, सार्वजनिक ठिकाणी खाद्यपदार्थ, कचरा, काचेच्या व प्लॉस्टिकच्या बाटल्या, थर्माकॉलचे व प्लॉस्टिकचे साहित्य उघड्यावर इतस्त्र फेकणे,सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या महिलांची छेडछाड करणे, टिंगलटवाळी करणे, महिलांशी असभ्य वर्तन करणे, असभ्य व अश्लील हावभाव करणे, शेरेबाजी करणे अथवा लज्जा निर्माण होईल असे कोणतेही वर्तन करणे, सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात संगीत यंत्रणा वाजविणे, डीजे सिस्टीम वाजविणे, गाडीमधील स्पीकर, वूफर वाजविणे व त्यामुळे ध्वनी प्रदूषण करणे, ज्या कृतीमुळे ध्वनी, वायू व जल प्रदूषण होईल अशी कोणतीही कृती करणे, अत्यावश्यक सेवा वगळून धबधब्याच्या १ कि.मी. परिसरात सर्व दुचाकी, चार चाकी व सहा चाकी वाहनांना प्रवेश या सर्व बाबींसाठी दि.१० जून ते दि.०९ ऑगस्ट २०२२ या कालावधीसाठी कर्जत प्रांताधिकारी अजित नैराळे यांनी प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

# पोलादपूर तालुक्यातील सवाद येथे कृषि दिन साजरा

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १जुलै रोजी तालुका कृषि अधिकारी पोलादपूर व पंचायत समिती पोलादपूर यांचे संयुक्त विद्यमाने सवाद येथे कृषि दिनाचे आयोजन करण्यात आले.

प्रारंभी माध्यमिक विद्यालय सवादच्या विद्यार्थिनींनी इशस्तवन करून केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सवाद ग्रामपंचायतीच्या सरपंच सुरेखा बुडबाडकर यांनी भूषविले. तालुका कृषि अधिकारी एन.वाय.घरत यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये १जुलै कृषिदिन साजरा करण्याबाबतची माहिती सांगून कृषी विभागाच्या फळबाग लागवड, यांत्रिकीकरण, विमा योजना अशा विविध योजनांची माहिती दिली. यावेळी गटविकास अधिकारी धनंजय जगताप यांनी वृक्षारोपण व पंचायत समितीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या योजनांविषयी माहिती दिली. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या वतीने कृषि क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या, उद्यान पंडित पुरस्कार प्राप्त शेतकरी रामचंद्र कदम यांचा सत्कार करण्यात आला. रामचंद्र कदम यांचे यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन लाभले.

यांप्रसंगी माजी पंचायत समिती सदस्य यशवंत कासार यांनी शेतकऱ्यांना आधुनिक शेती करण्याबाबत आवाहन केले. यांप्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नाखले उपस्थित होत्या. तसेच स्वच्छता सम न्वयक गायकवाड यांनी स्वच्छतेबद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात तालुक्यात उत्कृष्ट आधुनिक शेती करणारे शेतकरी व शेतकरी गट यांना प्रशस्ती पत्रक व शेती उपयोगी पुस्तके देवून सन्मानित करण्यात आले.

यावेळी मान्यवरांच्याहस्ते श्रीशंकर मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपणाप्रसंगी तालुका कृषि अधिकारी एन.वाय.घरत, गट विकास अधिकारी जगताप, मंडळ कृषी अधिकारी सूरज पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नाखले मॅडम, कृषि अधिकारी वसावे, विस्तार अधिकारी थिवरे, सामाजिक कार्यकर्ते शौकत तारलेकर, कालवलीचे माजी सरपंच वाय.सी.जाधव, दत्तात्रय उतेकर, जाधव, विविध ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, शेतकरी, कृषि सहाय्यक कृषि पर्यवेक्षक, ग्रामसेवक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषिसहाय्यक मनोज जाधव यांनी केले व उपस्थित मान्यवरांचे आभार कृषी पर्यवेक्षक भरत कदम यांनी मानले .

## प्रतिक देवचंद बहिरा जनसंपर्क कार्यालयाचे आ. प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल विधानसभेचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते प्रतिक देवचंद बहिरा जनसंपर्क कार्यालय चे उद्घाटन करण्यात आले. जनतेच्या विकासासाठी अनेक समाजकार्य आपल्या हातून घडावी व जनसेवेचे काम आपल्या हातुन अविरत चालू राहवे अशा शुभेच्छा त्यांनी प्रतिक बहिरा यांना दिल्या.





यावेळी गटनेते परेश शेठ ठाकूर, शहर अध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक नितीन पाटील, नगरसेवक अनिल भगत, नगरसेवक अजय बहिरा,नगरसेवक तेजस कांडपिळे, नगरसेविका चारुशीला ताई घरत, रायगड जिल्हा मराठा समाज अध्यक्ष विनोद दादा साबळे, मा नगरसेवक प्रभाकर बहिरा, मा नगरसेवक संदीप बहिरा, वार्ड अध्यक्ष रघुनाथ बहिरा, जेष्ठ नेते मनोहर मुंबईकर, मा.नगरसेवक देवचंद बहिरा, एकविरा युवक मंडळ अध्यक्ष संदीप खुटकर, युवा नेते सागर बहिरा, भा.ज.पा पदाधिकारी, कार्यकर्ते व श्री युवा प्रतिष्ठान चे कार्यकर्ते उपस्थित होते.